

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

November- 2021

ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Special Issue - 281

# History & Literature

**Guest Editor**

Prin. Dr. Sukhada Jamble

**Executive Editors**

Prof. Shrikant Sirsathe

Dr. Mahendra Kamat

**Chief Editor**

Dr. Dhannraj Dhangar

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

November 2021 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Special Issue 280

**Guest Editor :**
Dr. Sukhada Jamble
Principal,
Shri. S. H. Kelkar College of Arts,
Commerce & Science, Devgad
Dist. Sindhudurg

**Executive Editors :**
Prof. Shrikant V. Sirsathe
Dr. Mahendra Kamat

**Chief Editor :** Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : **www.researchjourney.net**

*Cover Photo (Source) : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

# INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Retracing the Trauma of Partition from the Selected Literary Works of Bapsi Sidhwa and Chaman Nahal | **Dr. Aditi Joshi** | 04 |
| 02 | Arwi Language and its Historical Landscape : An Overview | **Dr. K. M. A. Ahamed Zubair** | 08 |
| 03 | Literature as Historical Archive | **Dr. Balasaheb Yadav** | 11 |
| 04 | Mysterious Hibernation to Majestic Eminence : Historic Evolution in Literary Reception of Jibanananda Das's *'Rupasi Bangla'* | **Durbadal Datta** | 17 |
| 05 | Recreating History in Literature : A Study of 'Inquisition' in Mahabaleshwar Sail's *'Yug Sanvar'* | **Dr. Dattaguru Joshi** | 23 |
| 06 | Literature as the Reflection of History | **Dr. Mouchumi Dutta** | 28 |
| 07 | Karbi Folk Literature : A Study from Historical Perspective | **Dr. Jatin Sharma** | 31 |
| 08 | Analysis of *'Pali'* As Representation of Literature of Partition | **Dr. Manisha Mujumdar** | 39 |
| 09 | Representation of History in Manto's *'Open It!'* | **Dr. Satish Saykar, Dr. Vijay Padalkar** | 43 |
| 10 | Historical Novels : Facts Mingling With Fiction - An Inward Look Into Mizo History and Culture through the Novel *'Zorami'* by Malsawmi Jacob | **Pauline Lallawmzuali** | 45 |
| 11 | Representation of History in Girish Karnad's *'Tughlaq'* | **Dr. Rajesh Shesham** | 49 |
| 12 | Evolution of Historical Fiction in Contemporary Indian Writings in English | **Saritha Samuel** | 53 |
| 13 | An Overview of History and Literary Theory | **Shaziya Mohammed Irfan Momin** | 57 |
| 14 | The Postcolonial Tradition of Picture in the History in Kiran Desai's *'The Inheritance of Loss'* - A Study | **T. Narayana** | 59 |
| 15 | Portrayal of Gandhi in Shashi Tharoor's *'The Great Indian Novel'* | **Dr. Umakant Padamwar** | 64 |
| 16 | Proverbs as Source of Historical Facts : A Study of Selected Short Stories | **Dipak Ganmote** | 75 |
| 17 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील साहित्यिक | **डॉ. मधुकर जाधव** | 79 |
| 18 | इतिहास, साहित्य आणि आधुनिक संदर्भसाधने | **श्री. एस.एन. पाटील** | 87 |
| 19 | स्त्रीवादी साहित्य कादंबरी (१८५० ते १९५०)एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | **प्रा. श्री. अमोल कुंभार** | 95 |
| 20 | विश्वास पाटील यांच्या संभाजी कादंबरी मधून चित्रित होणारे व इतिहासाला कलाटणी देणारे धर्मवीर संभाजी महाराजांचं व्यक्तिचित्रण एक अभ्यास | **प्रा. सौ. अनुष्का रेवंडकर** | 101 |
| 21 | साहित्यातून इतिहासाच्या त्यागमय पानाची कहाणी अनंत तिबिले यांची 'महाराणी येसूबाई' ही कादंबरी | **प्रा. सौ. एस.एस. पाटील** | 105 |



*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

‘RESEARCH JOURNEY’ International E- Research Journal
Special Issue – 281 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal Impact Factor 6.625 (SJIF)
E-ISSN : 2348-7143
November- 2021

# इतिहास, साहित्य आणि आधुनिक संदर्भसाधने

**प्रा. श्री. एस.एन. पाटील**
इतिहास विभाग प्रमुख
आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग. 416810, महाराष्ट्र
मोबा.9834984411
ई-मेल- snphistory92@gmail.com

**गोषवारा :**

मानवी जीवनाच्या वाटचालीचा अभ्यास इतिहासात जातो. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. इतिहास म्हणजे भूतकालीन घटनांचा शोध होय. गतकाळातील वाटचाल कशी झाली, गतकाळातील घटना कशा घडल्या, त्याचे धागेदोरे धुंडाळावे लागतात. इतिहास अभ्यासासाठी प्रामुख्याने पुरातत्वीय (भौतिक) आणि वाङःमयीन (अभौतिक) साधनांचा वापर केला जातो. 'No Documents No History', 'ना कागदपत्र, ना इतिहास' अर्थात पुराव्याशिवाय इतिहास नाही. १५ व्या शतकानंतर यूरोपमध्ये लागलेले विविध शोध आणि औद्योगिक क्रांतीनंतर मानवाच्या जीवनपद्धतीमध्ये बदल झाला.आधुनिक काळातील इतिहासाचा अभ्यास करीत असताना आधुनिक साधनांचा वापर करावा लागतो. इतर साहित्यातूनही इतिहास समजण्यास मदत होते.

**प्रस्तावना :**

इतिहास हे मानवी जीवनाच्या वाटचालीचा अभ्यास करणारे एक सामाजिक शास्त्र आहे. गतक्षणापासून ते लक्षावधी वर्षांपूर्वीपर्यंतच्या मानवी वाटचालीचा आलेख इतिहासशास्त्रात रेखाटला जातो. गतकाळातील वाटचाल कशी झाली याचा अभ्यास इतिहासात केला जातो. भूतकाळात घडून गेलेल्या घटना कशा घडल्या असतील ? होऊन गेलेल्या महान विभूती कशा जगल्या असतील ? त्यांचे कार्य कसे साकारले असेल ? तत्कालीन समाजजीवन कसे असेल ? त्या समाजाची अभिव्यक्ती कशी साकारली असेल ? असे एक नाही अनेक प्रश्न इतिहासकाराच्या अभ्यासात निर्माण होतात. या प्रश्नांची उत्तरे इतिहासकार शोधताना इतिहासकाराला घटना कशा घडल्या असतील त्याचे धागेदोरे धुंडाळावे लागतात. पुरावे शोधावे लागतात. त्या पुराव्यांची विश्वसनीयता तपासावी लागते. त्यानंतर नेमकी घटना कशी घडली असेल त्याचे आधारभूत सत्य चित्र रेखाटले जाते. गतकाळातील घटनांचे, वाटचालीचे, समाजजीवनाचे, संस्कृतीचे, कला अभिव्यक्तीचे असंख्य धागेदोरे, पुरावे, याच मातीत लपलेले असतात. या गतकाळाच्या पाऊलखुणा म्हणजे इतिहासाची साधने होत. काळानुरूप इतिहासाची साधने बदलत गेलेली आहेत. या शोधनिबंधामध्ये इतिहासाची आधुनिक संदर्भ साधने यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**इतिहास :**

इतिहास म्हणजे भूतकाळ. भूतकाळातील घटनांची नोंद इतिहासामध्ये घेतली जाते. इतिहासासंबधी विविध काळात आणि विविध देशात वेगवेगळया व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. 'एनसायक्लोपिडिया ब्रिटानिका' मध्ये इतिहास या संज्ञेचा उपयोग दोन प्रकारांनी केला आहे. घटनांची जंत्री किंवा खुद्द घटना अशा अर्थानेही इतिहास शब्दाचा वापर केला जातो.अमेरिकन इतिहासकार हेन्री स्टील का□मेंजर याच्यामते, "इतिहास म्हणजे भूतकाळ आणि भूतकाळातील घडलेल्या घटना म्हणजेच इतिहास नव्हे तर दप्तरातील नोंदींचा

E-ISSN : 2348-7143
November- 2021

जेव्हा अर्थ लावला जातो त्या प्रक्रियेला इतिहास म्हणतात." ज्कोब बर्कहार्ट यांच्यामते, "इतिहास म्हणजे पुढल्या युगातील लोकांना मागील युगातील लोकांनी केलेल्या उल्लेखनीय घटना यांचा अनुभव घेणे होय." सुप्रसिद्ध इंग्रज विद्वान फान्सिस बेकन यांनी "मानवाला शहाणा बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास" अशी सुटसुटीत व्याख्या केली आहे. कार्ल मार्क्सने इतिहासाची व्याख्या "आजपर्यंतचा मानवजातीचा इतिहास म्हणजे आहेरे व नाहीरे यांचा संघर्ष होय." अशी केली आहे. इतिहासाचा जनक हिरोडोटसने "गतकाळातील अविस्मरणीय आणि महत्त्वाच्या घटनांचा शोध म्हणजे इतिहास." अशी केली आहे. "History Means an inquiry into interesting and memorable past event"- Herodotus. "वर्तमान आणि भूतकाळ यांच्यातील न संपणारा संवाद म्हणजे इतिहास" -इतिहासकार ई.एच.कार. "History is an unending dialogue between the past and the present"-E.H.Carr. "इतिहास म्हणजे घटनांची शृंखला होय."- हर्डर. "History is the chain of events" -Herder. या वरील सर्व व्याख्यांमधून इतिहास म्हणजे काय हे प्रतिपादन करण्यात आले आहे. या सर्व व्याख्यामधून एक समान सूत्र आढळते आणि ते म्हणजे भूतकालीन समाजघटक हे होय. इतिहास म्हणजे या भूतकालीन समाजघटकांचा अभ्यास होय.

**इतिहासाची साधने :**

इतिहास या विषयाचा संबंध भूतकाळाशी आहे. असा भूतकाळ संदर्भसाधनातूनच दिसून येतो. अशी संदर्भसाधने लिखीत वा अलिखीत स्वरुपामध्ये असतात. लिखीत कागदपत्रे ही इतिहास लेखनाचा मुख्य आधार आहे. फ्रेंच पध्दतीशास्त्रज्ञ सिईन बॉस व लजिलॉस म्हणतात," No documents No History", म्हणजे "ना कागदपत्र ना इतिहास." गतकाळाच्या माहितीशिवाय वर्तमानकाळातील समस्येवर उपाय आपल्याला सुचणे कठीण आहे. ऐतिहासिक संशोधनाचे मूल्य हे त्या इतिहासकाराने कोणत्या प्रकारची साधने वापरली आहेत याच्यावर अवलंबून असते. मूलभूत साधने हीच इतिहास लेखनाची पायाभूत साधने असतात. साधनांशिवाय इतिहास लिहिता येत नाही. इतिहास संशोधनात साधनाचे स्थान अनन्यसाधारण आहे.ऐतिहासिक साधने मुख्यतः दोन प्रकारची सतात. ती म्हणजे लिखित व अलिखित. या लिखित साधनांचे पुन्हा प्राथमिक व दुय्यम असे दोन प्रकार पडतात.

**इतिहासाची आधुनिक संदर्भ साधने :**

वरील प्रकारच्या साधनाशिवाय आधुनिक इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करताना आणखी एक वर्गवारी करावी लागते. आधुनिक इतिहासाची वाटचाल धुंडाळताना, उत्खनने, कार्बन १४ ची रासायनिक प्रक्रिया, अस्थीअवशेष, खापरे, नाणी, शिलालेख व ताम्रपट यासारखे पुरातत्वीय पुरावे किंवा करीने, तवारिदवा, बखरी, चरित्रे, काव्ये, महाकाव्ये, पुराणे स्थानपोथ्या असे पुराभिलेखीय पुरावे उपयोगी ठरत नाहीत. १९ व्या आणि २० व्या शतकातील वाटचाल रेखाटताना अगदी वेगळया प्रकारचे पुरावे धुंडाळावे लागतात.

१५ व्या शतकाच्या अखेरीस पाश्चात्त्य जगात आधुनिक युग अवतरले आणि सर्वच क्षेत्रात प्रचंड स्थित्यंतर घडून येण्याची प्रक्रिया सुरू झाली. औद्योगिक क्रांती, छपाई यंत्राचा शोध, वाफेच्या इंजिनाचा शोध, त्यातून सुरू झालेले यांत्रिकी उत्पादन, कच्च्या मालाची गरज, तयार मालासाठी बाजारपेठ आणि भांडवलशाही, वसाहतवादी, साम्राज्यवादी विस्तार या प्रक्रियातून सारे जग आमूलाग्र बदलत गेले.बदलत्या जगाच्या वाटचालीतल्या पाऊलखुणांचे स्वरूपही बदलत गेले. साधनांचे, पुराव्यांचे स्वरूपही बदलले. हस्तलिखित कागदपत्रांच्या जागी आता छापील, प्रकाशित मजकूर उपलब्ध होऊ लागला. शिलालेख आणि ताम्रपटांच्या जागी आता सरकारी गॅझेट, सूचनापत्र, टंकलिखित किंवा प्रकाशित स्वरूपात येऊ लागली. बदलत्या जगाची

चाहूल आपल्याकडेही १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात लागली. आपल्याकडेही प्रचंड स्थित्यंतरे घडून आली. त्यामुळे इतिहासाच्या साधनांचे स्वरूप पूर्णपणे बदलून गेले आहे.

इतिहास संशोधनाची व्याप्ती वाढत असल्याने पुढील संदर्भ साधनांचा समावेश संदर्भ साधनांच्या जंत्रीमध्ये करण्यात येतो. त्यामध्ये साहित्य, मुलाखती, वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, सर्वेक्षण, सार्वजनिक संदर्भ साधने, खाजगी कागदपत्रे व संसदीय कागदपत्रे इ. ही आधुनिक संदर्भ साधने आहेत.

**१) इतिहास आणि साहित्य :**

इतिहास आणि साहित्य यांचा नातेसंबंध बघता हा परस्परांना पूरक असणारा आहे. इतिहास जेव्हा साहित्यातून शब्दबद्ध होतो तेव्हा तत्कालीन कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक हे सगळे संदर्भ साहित्यात येतात.त्याचबरोबर तत्कालीन समूहाची एकूणच मनोधारणा, नीतिमूल्य, श्रद्धा-अंधश्रद्धा हे संदर्भ शब्दबद्ध होतात. असा येणारा संदर्भ म्हणजे इतिहासकालीन कालखंडाचा आरसा असतो.

इतिहास हा तसा कथनाचा भाग असतो. हे कथन साहित्यिक जेव्हा शब्दातुन मांडतो, तेव्हा त्या कथनाला साहित्याचे अनेक बंध समृद्ध करतात. त्याचबरोबर हे कथन वस्तुनिष्ठतेला धरून असावे. त्यामध्ये सत्यता असावी, अशी अपेक्षा असते. याला अनुसरून लेखक एका सत्यशोधकाच्या भूमिकेतून ऐतिहासिक घटना, प्रसंग यांच्याकडे बघत असतो. पण काहीवेळा ऐतिहासिक कादंबरी लेखनाला यातून थोडीशी सूट मिळते. मूळ ऐतिहासिक घटना प्रसंग साहित्यातून मांडताना जी कलात्मकता यावी लागते, त्यासाठीही सुट असते. या कलात्मकतेमुळे ऐतिहासिक घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा वाचनीय होतात. या वाचनानूतच इतिहास वाचकांसमोर उलगडत जातो. साहित्यातून उलगडणारा इतिहास बरेचदा आकर्षक, रोमांचकारी आणि उत्साहवर्धक अशा स्वरूपाचा असतो. त्यामुळे असे म्हणता येते की, साहित्यातून बराचसा इतिहास वाचकांच्या पर्यंत पोचतो, जो इतिहासकालीन साधनांमधून पोहोचू शकत नाही.

RESEARCH JOURNEY

साहित्यक्षेत्रात अनेक साहित्यप्रकार आहेत. जसे की कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन,आत्मचरित्र, चरित्र, एकांकिका, आत्मकथन इत्यादी. या सगळ्या प्रकारांमध्ये कादंबरी हा साहित्यप्रकार थोडासा आणखीन वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण या साहित्यप्रकारामध्ये सगळे विषय सामावून घेण्याचा परीघ मोठा असतो. त्यामुळे भूतकाळ, वर्तमानकाळ आणि अगदी भविष्यकाळ याच्यावरही एखाद्या कथाबिंदूतून कादंबरीकार आपल्या कलात्मकतेने भाष्य करू शकतो. त्यामुळे कादंबरी या वाङ:मय प्रकारात ऐतिहासिक कादंबरीही निर्माण झालेली दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून या अशा प्रकारच्या कादंबरीचा संदर्भ सापडतो. 'मोचनगड' ही पहिली रा.बी.गुंजीकर लिखित ऐतिहासिक कादंबरी होय. इथून पुढे अशा अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या मराठी साहित्यामध्ये लिहिल्या गेल्या. आधुनिक काळात तर अनंत तिबिले, शिवाजी सावंत , रणजित देसाई, ना. स. इनामदार, विश्वास पाटील हे ऐतिहासिक कादंबरीकार लोकमान्य आणि प्रसिद्ध आहेत. या लेखकांच्या साहित्यातून जो इतिहास कादंबरीच्या रुपाने शब्दबद्ध झाला त्याचे फलित म्हणजे लोकांच्यामध्ये ऐतिहासिक जाणिवा जागृत झाल्या. आपल्या समाजाचा भूतकाळ, त्यातील अभिमानास्पद गोष्टी, काही पराक्रमी व्यक्तिरेखा यांच्या बद्दलच्या निष्ठा समृद्ध झाल्या. इतिहास रंजक पद्धतीने का असेना पण वाचायला आवडू लागला, हे विशेष आहे.

**२) मुलाखत :**

समकालीन इतिहासलेखनाचे साधन या नात्याने मुलाखत तंत्राला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मुलाखत म्हणजे तोंडी पद्धतीने संदर्भ साधन जमविण्याचा मार्ग होय. मुलाखतीद्वारे संशोधकाला अत्यंत

प्रभावीपणे आपले विचार समाजापुढे मांडता येतात. मुलाखतीच्या तंत्राचे समीक्षण करताना प्रो.जी. डब्ल्यू. ऑलपोर्ट म्हणतात, 'जर तुम्हास लोकांना काय वाटते, त्यांना कोणता अनुभव आला, त्यांची स्मृती कितपत ताजी आहे, त्यांच्या भावभावना कोणत्या आहेत', त्यांच्या आवडीनिवडी कोणत्या आहेत, हे समजून घेण्यासाठी मुलाखतीचे तंत्र अत्यंत उपयुक्त आहे. व्यक्तीचे ऐतिहासिक चित्र समाजापुढे उभे करण्यास मुलाखत हे एक महत्वाचे तंत्र आहे.शास्त्रीय दृष्ट्या विचार केला असता आकारिक मुलाखत (Structured Interview) व मुक्त मुलाखत (Unstructured Interview) असे मुलाखतीच्या तंत्राचे मुख्यतः दोन प्रकार आहेत. यापैकी आकारिक मुलाखतीमध्ये पूर्वनियोजित, साचेबंद प्रश्न विचारले जातात. त्यामुळे मिळणारी उत्तरे साचेबंद असतात. मुक्त मुलाखतीमध्ये कोणत्याही पूर्व नियोजनाशिवाय प्रश्न विचारले जातात. अशा प्रश्न उत्तरामध्ये प्रमाणबद्ध प्रतिसादाची अपेक्षा नसते. अशा प्रकारांमध्ये मुलाखतकाराला आपल्याला कोणते उत्तर मिळेल हे निश्चित सांगता येत नाही. मुलाखतकाराने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देणाऱ्याला तो प्रश्न योग्य वाटल्यास तो त्या प्रश्नाचे उत्तर देईल. मुक्त मुलाखत ही संपूर्णपणे उत्तर देणाऱ्याच्या प्रतिसादावर अवलंबून असते. समकालीन इतिहास लिहिण्यासाठी मुलाखतीच्या तंत्राचा वापर करतात. मुलाखत कशी घ्यावी याचे काही नियम आहेत. कागदपत्रांमध्ये नसलेली जादा माहिती मुलाखतीद्वारे मिळू शकते. मुलाखतीच्या तंत्राने व्यक्ती आणि प्रसंग यांचा अन्वयार्थ लावणे सोपे जाते. मुलाखतीच्या आधारे उपलब्ध कागदपत्रांचा अर्थ लावणे सोपे जाते हे मुलाखतीचे फायदे आहेत. मुलाखत घेणारा वर देणारा यांना मर्यादा असतात. त्या जर लक्षात आल्या नाही तर मुलाखत वेगळया दिशेने वाहत जाण्याची शक्यता असते. मुलाखत जर वयस्कर व्यक्तीची असेल तर बऱ्याच वेळा विचारलेल्या प्रश्नापासून व्यक्ती दूर जातो व स्वप्नरंजनात गुंतून पडतो. त्या मुलाखतीचा हेतू नष्ट होण्याची शक्यता असते. मुलाखत जर एखाद्या धंदेवाईक राजकारणी व्यक्तीची असेल तर तो मुद्दाम मुलाखतकाराची दिशाभूल करण्याची शक्यता असते, इत्यादी मुलाखतीचे दोष मुलाखत तंत्रामध्ये दिसतात. प्रो.अ□न्थनी शेल्डन यांच्यामते मुलाखतीचे तंत्र हे आधुनिक संदर्भ साधनांपैकी एक अनाकलनीय (black ship) साधन आहे. तथापि इतिहासाचे साधन म्हणून अपारंपारिक साधन या दृष्टीने मुलाखतीच्या तंत्राचा वापर फार सावधगिरीने करणे आवश्यक आहे.

RESEARCH JOURNEY

**३) वृत्तपत्रे, रेडीओ व टेलिव्हिजन :**

वृत्तपत्रे ही समाजमानस घडवणारी महत्त्वाची साधने आहेत, हे आज जगमान्य आहे. वृत्तपत्रांनी प्रत्येक महत्त्वाची घटना समाजापर्यंत पोहोचवावी अशी अपेक्षा आहे. वृत्तपत्रांची विश्वासाहर्ता, ती वृत्तपत्रे बातम्या किती प्रामाणिकपणे देतात यावर अवलंबून असते. समाजाला योग्य मार्गदर्शन करणे हाच वृत्तपत्र व्यवसायाचा मुख्य बाणा असला पाहिजे. समाजामध्ये विविध राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांसंबंधी जागृती निर्माण करण्याचे काम वृत्तपत्रे करीत असतात. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला योग्य वळण देण्याचे कार्य लोकमान्य टिळकांच्या केसरीने केले. लोकमान्य टिळकांचे लिखाण सत्यावर, प्रामाणिकपणावर अवलंबून असल्याने आज केसरी वृत्तपत्राचे जुने अंक इतिहासाचे साधन म्हणून उपयोगात आणणे शक्य आहे. लो.टिळकांच्या केसरी मधील लिखाणामुळे व्हॅलेंटाईन चिरालेने त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' ही पदवी बहाल केली. अशा प्रकारचे जनजागरणाचे काम वृत्तपत्राने केले पाहिजे अशी अपेक्षा वृत्तपत्रांकडून आहे. आज कालच्या भारतीय वृत्तपत्राकडून अशी अपेक्षा बाळगू शकत नाही. आजची भारतीय पत्रकारिता कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाला वाहून घेणारे असल्याने त्यांच्या बातमी पत्रावर फारसा विश्वास ठेवता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. तरीही आधुनिक कालखंडातील वृत्तपत्रे ही जशी लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत, तशी ती माहिती देणारी प्रमुख साधनेही आहेत.

रेडिओ हेसुद्धा इतकेच महत्वाचे प्रसारमाध्यम आहे. रेडिओवरील बातम्या, वृत्तविशेष, घटनांचे समालोचन ही सर्व समाजप्रबोधनाची साधने आहेत. यासंदर्भात बी.बी.सी. रेडिओ एक अत्यंत विश्वसनीय साधन आहे.

दूरदर्शनने आधुनिक जगात क्रांती घडविली आहे. घटना घडत असतानाच त्याची माहिती आपणास कळू शकते. मग ही बातमी कल्पना चावलाच्या उपग्रहाची असो किंवा इराण युद्धाची असो. अफगाणिस्तानमधील राजकीय परिस्थितीचे वर्णन जसेच्या तसे घरबसल्या आपणास दिसू शकते. बी.बी.सी.ने इंग्लंडमधील शास्त्रज्ञ तज्ञ डॉ.डेव्हिड केलीसंबंधी दिलेली माहिती इंग्लंडचा पंतप्रधान टोनी ब्लेअर याना आरोपीच्या कठड्यात उभे करण्यास कारणीभूत ठरली.अशाप्रकारे आपल्या व्यवसायाला पूर्ण निष्ठा वाहिलेली प्रसारमाध्यमे हीच इतिहासाची आधुनिक साधने ठरु शकतात.

**४) सर्वेक्षण :**

सर्वेक्षण म्हणजे समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण असे म्हटल्यास वावगे होणार नाही. सर्वेक्षणाचे समकालीन इतिहासा साधन या दृष्टीने महत्त्व मानले जाते. राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासासाठी असे सर्वेक्षण मौल्यवान तसेच इतिहास संशोधन प्रक्रियेचे महत्त्वाचे अंग ठरु शकते. सर्वेक्षणामध्ये 'सामाजिक शास्त्र संशोधना'ची बरीचशी वैशिष्ट्ये दिसून येतात. सर्वेक्षण करीत असताना वस्तुनिष्ठता सांभाळणे आवश्यक असते. व्यक्ती वा संशोधक मूलतः व्यक्तिनिष्ठ (Subjective)असल्याने बऱ्याच वेळा केलेल्या सर्वेक्षणाला मर्यादा पडू शकतात. सर्वेक्षणाचे संदर्भ साधन या दृष्टीने असलेल्या महत्त्वाबद्दल प्रो.टा□म ना□सिटर म्हणतात की, 'सर्वेक्षणावर विश्वास ठेवण्याच्या संदर्भात राजकीय इतिहासकार(Political Historian) जी निरिच्छ व तटस्थपणाची भूमिका स्वीकारतात ती अनाकलनीय आहे. अशा इतिहासकारांचा सर्वेक्षणामधून आलेले निष्कर्ष गृहीत धरण्याकडे कल नसतो. या बाबीचे समर्थन करणे खरेच कठीण आहे. असे इतिहासकार सर्वेक्षणाने आलेली महत्त्वाची माहिती टाळतात,ही इतिहासाची हानी आहे. या विधानाचा अर्थ असा की, इतिहासकाराने सर्वेक्षणामधील निष्कर्ष टाळू नयेत तर योग्य परिक्षणानंतर त्याचा स्वीकार करावा. अशा प्रकारच्या सर्वेक्षणामध्ये काही उणीवा दिसून येतात. तसेच इतिहासकाराने इतरांच्या सर्वेक्षणावर अवलंबून न राहता स्वतः सर्वेक्षण करावे. थोडक्यात राजकीय, सामाजिक, आर्थिक, लोकसंख्या इत्यादीबाबत सर्वेक्षण अतिशय काळजीपूर्वक करावे लागते. त्याचा उपयोग इतिहासासाठी करता येतो. जर या साधनाचा उपयोग योग्य तऱ्हेने केला तर सर्वेक्षण हे इतिहासाचे महत्वाचे संदर्भ साधन ठरू शकते.

**५) सार्वजनिक संदर्भ साधने :**

सार्वजनिक व्यक्तीने लिहिलेली, सार्वजनिक उपयोगासाठी असणाऱ्या कागदपत्रांना सार्वजनिक संदर्भ साधन (Publice Records) म्हणतात. ही कागदपत्रे ठेवण्यासाठी ज्या शासकीय इमारतीचा उपयोग करतात त्यांना दप्तरखाना, पुराभिलेखागार किंवा आर्कईव्हज म्हणतात. आपल्या सर्वसाधारण वापरात आर्कईव्हज व हस्तलिखिते (Archives,manuscripts) हे शब्द ढोबळमानाने वापरले जातात. खऱ्या ख-या अर्थाने हे समान अर्थी शब्द नाहीत.आर्कईव्हज म्हणजे कागदपत्रे, निवडक कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे ठेवण्याची जागा होय. हस्तलिखिते ही ग्रंथालयांनी, खाजगी व्यक्तींनी गोळा केलेली किंवा एखाद्या खाजगी व्यक्तीकडे असलेली कागदपत्रे असे याचे स्वरूप असू शकते. सार्वजनिक संदर्भ साधनांचा महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केल्यास मुंबईसह इतर अनेक ठिकाणी अशा प्रकारची पुराभिलेखागारे आहेत. त्यामध्ये 'डायरी', 'आवकपत्रे', 'जावकपत्रे', 'कोर्ट ऑफ डायरेक्टरकडून आलेली पत्रे', 'सिक्रेट अँड पोलिटिकल डिपार्टमेंट' अशा शीर्षकाखाली पत्रे आहेत. त्याचा उपयोग इतिहास संशोधनासाठी होतो. अशा प्रकारे सार्वजनिक संदर्भ साधने आपल्याला दिसून येतात.

**६) खाजगी कागदपत्रे :**

इतिहासाच्या जडणघडणीमध्ये कर्तबगार व्यक्तींचा व त्यांच्या कार्याचा फार मोठा सहभाग असतो. सार्वजनिक कागदपत्रे संदर्भ साधनांच्या स्वरूपात जशी महत्वाची असतात, त्याचप्रमाणे खाजगी कागदपत्रेही महत्त्वाचे असतात. खाजगी कागदपत्रे ही डायरी, पत्रव्यवहार, आठवणी इत्यादींचा स्वरूपात उपलब्ध

असतात.महत्वाच्या व्यक्ती आपल्या कारकिर्दीमध्ये घडलेल्या घटना, व्यक्ती, प्रसंग यासंबंधी स्वतःच्या मतांची नोंद ठेवीत असतात. या कागदपत्रांचे वैशिष्ट्य असे असते की, ती प्रामुख्याने अत्यंत खाजगी स्वरूपाची, वैयक्तिक असतात. मुख्यतः अशा प्रकारची कागदपत्रे भावीकाळात कोणीतरी यावर आधारुन इतिहास लिहील असा दृष्टिकोन डोळयापुढे ठेवून लिहिलेली नसतात. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीला जे वाटले, जे अनुभव आले त्यांचे चित्रीकरण अशा कागदपत्रांमध्ये असते. राजकीय व्यक्तीच्या पत्रव्यवहारामध्ये त्याने आपल्या घरच्या माणसांना लिहिलेली पत्रे असतात. आपले मित्र, पक्ष कार्यकर्ते यांच्याशी केलेले पत्रव्यवहार असतात. खाजगी कागदपत्रांचे महत्व त्या व्यक्तीच्या स्थानावर अवलंबून असते.ब-याच महत्त्वाच्या व्यक्तींना 'डायरी' लिहिण्याची सवय असते. डायरीमध्ये त्या व्यक्तीच्या दैनंदिन जीवनामधील राजकीय व सामाजिक जीवनातील महत्त्वाच्या घटनांची नोंद असते. इतिहास लिहित असताना अस्सल कागदपत्रांमधील घटना, दिनांक या नेत्याच्या डायरीमधील घटना दिनांकाशी जोडल्या गेल्या म्हणजे लिखाणाला जास्त दर्जा प्राप्त होतो.आधुनिक काळात सर्व खाजगी कागदपत्रे परिपूर्ण असत नाहीत असे प्रो.अ□जेंलो र□सपिन म्हणतात. व्यक्ती प्रमाणेच विविध संस्थाही आपली कागदपत्रे जपून ठेवतात. रेल्वे, बँका आपली कागदपत्रे व्यवस्थित जपून ठेवतात. स्टेट बँक ऑफ इंडियाने सुरुवातीपासूनची सर्व कागदपत्रे जपून ठेवली, त्याच्या आधारावर प्रो. अमीयकुमार बागची याने 'हिस्ट्री ऑफ दि स्टेट बँक' हा दोन खंडात ग्रंथ लिहिला. खाजगी कागदपत्रांमध्ये तीन प्रकार असतात. संपूर्णपणे बाहेर दाखवण्यास बंदी असलेला पत्रव्यवहार, कागदपत्रापर्यंत पोहोचण्यासाठी असणारी बंधने व कागदपत्रे प्रसिद्ध करण्यास बंधन असते. अशा प्रकारे खाजगी कागदपत्रे हे जरी इतिहासाचे संदर्भ साधन असले तरी त्याचा वापर अतिशय काळजीपूर्वक करावा लागतो.

**७) संसदीय कागदपत्रे :**

ब्रिटिश पार्लमेंट हे जगातील पार्लमेंटची जननी असल्यामुळे अशा संसदेमध्ये कशा प्रकारची कागदपत्रे आहेत याचा विचार या ठिकाणी करता येईल.भारतीय पार्लमेंटमध्येसुद्धा अशाच प्रकारची कागदपत्रे असावीत, ब्रिटिश पार्लमेंटची मुख्य चार कार्य आहेत. कायदे करणे, अर्थविषयक, प्रतीनिधित्वासंबंधीच्या बाबी व न्यायदानविषयक सर्व प्रकारचे कायदे दोन्ही सभागृहात हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ ला□र्डस चर्चा करूनच केले जातात. या वेळी झालेली संपूर्ण चर्चा कागदपत्रांमध्ये नोंद केलेली असते. पार्लमेंटची निवडणूक हा ब्रिटिश जीवनाचा मुख्य आधार आहे. निवडणुकीच्या वेळी जाहिरनामे प्रसिद्ध होतात. त्यानुसार सत्तेवर आलेला पक्ष कायदे करीत असतो. अशा प्रकारचे जाहीरनामे "The Times Guide to the House of Commons" या शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात येतात. पार्लमेंटने "British General Election Manifestos 1900-1974" हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. पार्लमेंटच्या उद्घाटनाच्या वेळी राणीचे भाषण असते. त्यामध्ये पार्लमेंटपुढे असणाऱ्या समस्यांचा आढावा घेतलेला असतो. भारतामध्येसुद्धा हीच प्रथा अवलंबिलेली आहे. पार्लमेंटमध्ये मांडण्यात येणारे प्रत्येक बिल पहिल्या वाचनाच्या आधी छापून जनतेच्या माहितीसाठी वाटले जाते. ते वाचून त्यावर जनतेच्या येणाऱ्या सूचनांचा विचार केला जातो, हा सर्व पत्रव्यवहार स्ट□न्डिग कमिटी, स्पेशल स्ट□न्डिग कमिटी व सिलेक्ट कमिटीपुढे जातो, त्यावर चर्चा होते. याची नोंद पार्लमेंटरी कागदपत्रांमध्ये केली जाते. अशा कागदपत्रांवरून इतिहास लिहिणे सोयीचे होते.

**निष्कर्ष-**

इतिहास म्हणजे भूतकाळ. या भूतकालीन घटनांचा अभ्यास इतिहासात केला जातो. इतिहास लेखनासाठी साधने महत्त्वाचे असतात. भौतिक व वाङःमयीन अशा प्रमुख दोन प्रकारची साधने वापरली जातात. फ्रेंच पद्धतीशास्त्रज्ञ सिईनबा□स व ल□जिला□स म्हणतात, "No Document No History", "ना कागदपत्र ना इतिहास". पंधराव्या शतकानंतर यूरोपमध्ये लागलेले विविध शोध व औद्योगिक क्रांतीनंतर

उदयास आलेल्या विविध भौतिक साधनांनी मानवी जीवनाच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे आधुनिक काळातील इतिहास लेखनासाठी साहित्य, मुलाखत, वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, सर्वेक्षण, सार्वजनिक संदर्भसाधने, खाजगी कागदपत्रे व संसदीय कागदपत्रे इत्यादी विविध साधनांचा इतिहास लिखानासाठी उपयोग करावा लागतो. किंबहुना या आधुनिक साधनांशिवाय आधुनिक काळातील इतिहास लिहिणे अशक्य आहे.

**समारोप-**

इतिहासाचे संशोधन करताना या सगळ्या साधनांचा उपयोग होत असतो. बरेचदा प्रत्येक ठिकाणी एकाच प्रकारच्या साधनांचा उपयोग होईल असे नसते. अशावेळी या सर्व साधनांपैकी त्या ठिकाणी योग्य असणारे साधन वापरावे लागते. ही सगळीच साधने इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. या साधनांच्यामधून जो इतिहास उलगडतो तो इतिहासही प्रत्येक साधनाच्या स्वरूपानुसार समोर येत जातो. जसे मुलाखतीतून येणारा इतिहास आणि एखाद्या संग्रहीत कागदपत्रांच्यामधून येणार इतिहास, या दोन्हींच्यामध्ये फरक असू शकतो. या अर्थाने हे वेगळेपण येते. अशावेळी इतिहासकाराने तारतम्य ठेवत, सत्यशोधकाची भूमिका स्वीकारत या सर्व साधनांचा उपयोग करणे यथोचित ठरते. याच बरोबर या सर्व साधनांचे भाषा हेच माध्यम आहे. जेव्हा हीच भाषा साहित्यातून येते तेव्हा इतिहासाचे रूप आणखीन बदलते. भाषेतून उलगडणारा इतिहास हा कलात्मकतेने मांडलेला असतो. ऐतिहासिक प्रसंग, घटना, त्यातील व्यक्ती, त्याची ऐतिहासिक कामगिरी आणि त्याच बरोबरीने त्या व्यक्तीचे व्यक्तिगत जीवन, भावविश्व, नातेसंबंध यांच्याबरही प्रकाश टाकलेला असतो. हे सगळं शब्दांकित करताना लेखक थोडी मोकळीक घेत इतिहासाला कलात्मक कलाटणी देतो. त्यामुळे साहित्याच्या भाषेतून येणारा इतिहास आणखीन वेगळा ठरतो. शिवाय साहित्यातून उलगडणारा इतिहास हा वाचकप्रिय होत असतो, हे आपण नाकारू शकत नाही. सर्वसामान्य वाचकांना तर साहित्याच्या रुपाने येणारा इतिहासच जास्त आकर्षणाचा भाग असतो. मग तो कादंबरीतून असो, नाटकातून असो, अगर गीतरचनेतून असो, सामान्य वाचकांना हे साहित्यप्रकार आकर्षित करताच. याचा फायदा असाही होतो की आपला भूतकाळ ज्यांच्या - ज्यांच्या पराक्रमाने गाजलेला आहे त्यांच्याबद्दलचा अभिमान जनमानसात जागृत होतो. त्यातूनच आदर, निष्ठा, अभिमान ही मूल्य समाजात रुजतात. साहित्याची ही फार मोठी देणगी आहे. साहित्य आणि इतिहासाचे नाते हे अशाप्रकारे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. इतिहास म्हणजे काय ?- कार ई.एच.,अनुवाद प्रा.लेले. वि. गो.,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे- ३०.
२. इतिहास एक शास्त्र- डॉ. देव प्रभाकर, कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर नांदेड, ०२, दि.१ जानेवारी, २००२.
३. इतिहासलेखनपद्धती- डॉ.सरदेसाई.बी. एन., फडके प्रकाशन, कोल्हापूर १२,पहिली आवृत्ती फेब्रुवारी- २००४.
४. इतिहास लेखन परिचय- डॉ.सरदेसाई. बी. एन., फडके प्रकाशन, कोल्हापूर-१२, प्रथमावृत्ती- सप्टेंबर २००६.
५. इतिहासलेखन विकिपीडिया.
६. मराठी वाङ्मय प्रकार: स्वरूप, संकल्पना व वाटचाल, संपादक डॉ.द. के.गंधारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर ०९, पहिली आवृत्ती-जानेवारी २०१७.

७. अर्वाचीन मराठी वाङ्:मयाचा इतिहास, प्राचार्य डॉ.वसंत बिरादार, कैलास पब्लिकेशन्स् औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती १५ ऑगस्ट २०१७.
८. महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, प्रा.अ. रा. कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन्स पुणे ३०, प्रथम आवृत्ती मे २००८.
९. साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन, प्रभाकर बागले, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर ०९, पहिली आवृत्ती ७ ऑगस्ट २०१४.
१०. साहित्यवेद, के.रं शिरवाडकर, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे ३०, प्रथमावृत्ती जानेवारी १९९८.